**अनुक्रमणिका**


**१. प्रस्तावना**

**२. फसवणुकींचे वर्गीकरण**

**३. आरबीआयला फसवणुकी कळविणे**

३.१ रु. १ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेची

३.२ तत्व शून्य कर्जदारांनी केलेल्या फसवणुकी

३.३ रु. २५ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकी

३.४ फसवणुक करण्याचा प्रयत्न केल्याबाबतची प्रकरणे

**४. तिमाही रिटर्न्स**

४.१ न फेडलेल्या फसवणुकीवरील अहवाल

४.२ फसवणुकीवरील प्रगती - अहवाल

**५. मंडळाला पाठविण्याचे अहवाल**

५.१ फसवणुकी कळविणे

५.२ फसवणुकींचे तिमाही अवलोकन

५.३ फसवणुकींचे वार्षिक अवलोकन

**६. पोलिसांना फसवणुकी कळविण्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे**

एफएमआर - १ : एनबीएफसीमधील प्रत्यक्ष घडलेल्या किंवा संशयास्पद फसवणुकीचा रिपोर्ट

एफएमआर -२ : न फेडलेल्या फसवणुकीवरील तिमाही रिपोर्ट

एफएमआर - ३ : रु. १ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकीसंबंधी तिमाही प्रगती - अहवाल

## १. प्रस्तावना

१.१ एनबीएफसी होणाऱ्या फसवणुकीच्या घटना ही एक काळजी करण्यासारखी बाब आहे. अशा फसवणुकी न होऊ देणे ही एनबीएफसीज्चीच प्राथमिक जबाबदारी आहे व अशा फसवणुकींबाबतचा रिपोर्ट पाठविण्याची प्रणाली/पद्धत पुढील परिच्छेदांमध्ये दिली आहे व एनबीएफसींनी तिचा अंगिकार करावा.

१.२ अनेक वेळा एनबीएफसीमध्ये एखादी फसवणुक केली गेल्यानंतर ती बऱ्याच काळानंतर उघडकीस येते. ह्यासाठी एनबीएफसींनी अशी एक रिपोर्ट करण्याची प्रणाली तयार करावी की ज्यामुळे फसवणुकी विनाविलंब कळविल्या जातील. रिझर्व बँकेला फसवणुकीबाबत रिपोर्ट पाठविण्यात विलंब झाल्यास एनबीएफसींनी कर्मचाऱ्यांचे दायित्व/जबाबदारी ठरवावी.

१.३ फसवणुक कळविण्यात होणारा विलंब व त्यामुळे, तत्वहीन कर्जदारांची त्याबाबतची कार्यरीत तसेच सावधानतेचा इशारा इतर एनबीएफसींना कळविण्यास होणारा विलंब ह्यामुळे अन्य ठिकाणीही अशाच फसवणुकी केल्या जाऊ शकतात. ह्यासाठी एनबीएफसींनी, ह्या परिपत्रकात दिलेल्या, रिझर्व बँकेला कळविण्याबाबतच्या कालावधीचे काटेकोरपणे पालन करावे व ह्यात हयगय झाल्यास, आरबीआय अधिनियम १९३४ च्या प्रकरण ५ च्या तरतुदीनुसार विहित केलेली दंडात्मक कारवाई केली जाईल.

१.४ एनबीएफसींनी ह्यासाठी महाव्यवस्थापक किंवा त्याच दर्जाच्या एखाद्या खास अधिकाऱ्याची नेमणुक करावी. हा अधिकारी ह्या परिपत्रकात संदर्भित केलेले सर्व अहवाल रिझर्व बँकेकडे पाठविण्यास जबाबदार असेल.

१.५ येथे नमूद करण्यात यावे की एनबीएफसींनी ''शून्य'' (नील) असे रिपोर्ट्स डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजन/फ्रॉड मॉनिटरिंग सेल ला पाठविण्याची आवश्यकता नाही. परंतु त्याचवेळी ठेवी स्वीकारणाऱ्या एनबीएफसींनी खात्री करुन घ्यावी की त्यांनी कळविलेली प्रकरणे फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल/डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनच्या प्रादेशिक कार्यालयांना मिळाली आहेत.

## २. फसवणुकींचे वर्गीकरण

२.१ अहवाल पाठविण्यामध्ये एकसमानता यावी ह्यासाठी, भारतीय दंड संहितेच्या तरतुदींवर मुख्यतः आधारित असे फसवणुकींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

(अ) अफरातफर व फौजदारी स्वरुपाचा विश्वासभंग

(ब) खोट्या सह्या केलेल्या संलेखांद्वारे लबाडीने पैसे काढणे/वटविणे, बुक्स ऑफ अकाऊंट्समध्ये खोट्या नोंदी करणे (मॅनिप्युलेशन) किंवा खोटी/कल्पित खाती व मालमत्तेचे रुपांतरण करणे.

(क) बक्षिसासठी किंवा बेकायदा समाधानासठी अप्राधिकृत कर्ज सुविधा देणे.

(ड) निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट येणे.

(ई) फसविणे व बनावट कागदपत्रे देणे.

(फ) विदेशी मुद्रा व्यवहारातील अनियमितता

(ग) वरील शीर्षकांखाली न येणारी अन्य प्रकारची लबाडी

२.२ वरील (ड) व (फ) बाबींमधील ''निष्काळजीपणा व रोकड कमी पडणे'' आणि ''विदेशी मुद्रा व्यवहारातील अनियमितता'' ह्याबाबतची प्रकरणे ही, फसविणे/लबाडीच्या उद्देशाची शंका असल्यास/सिद्ध झाल्यासच लबाडी म्हणून

कळविली जावीत. तथापि, उघड करते वेळी, जेथे फसवणुकीच्या उद्देशाची शंका न आल्यास किंवा सिद्ध न झाल्यास पुढील प्रकरणे फसवणुक/लबाडी म्हणून समजली जावीत व त्यांचा त्यानुसार रिपोर्ट त्यानुसार रिपोर्ट दिला जावा.

*(अ) रु. १०,००० पेक्षा अधिक रोख रक्कमेची तूट आढळल्याची प्रकरणे*
*(ब) व्यवस्थापन/तपासनीस/तपासणी अधिकारी ह्यांना रु. ५००० पेक्षा अधिक रकमेची तूट आढळून येणे व रोकड हाताळणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत न कळविणे.*

२.३ परदेशात शाखा/कार्यालये असलेल्या एनबीएफसींनी त्या शाखा/कार्यालयात घडलेल्या फसवणुकीचे रिपोर्ट्स खालील परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या नमुन्यात व त्या कार्यरीतीनुसार रिझर्व बँकेकडेही पाठवावेत.

## ३. फसवणुकीबाबत रिझर्व बँकेला कळविणे

### ३.१ रु. १ लाख व त्यावरील फसवणुकी

३.१.१ विपर्यास (मिसरिप्रेझेंटेशन), विश्वासाचा भंग, बुक ऑफ अकाऊंट्समध्ये फिरवाफिरव, एनबीएफसीला आकारलेल्या सिक्युरिटीज अनाधिकृतरीत्या हाताळल्या जाणे, लबाडीने एफडीआर्सचे रोखीकरण करणे, मिसफीझन्स, अफरातफर, निधीची अफरातफर, मालमत्तेचे रुपांतरण, फसविणे, तूट, अनियमितता इत्यादींमधून रु. १ लाख व अधिक रकमेबाबतच्या फसवणुकींच्या सर्व प्रकरणांचे रिपोर्ट्स सादर केले गेले पाहिजेत.

३.१.२ जेथे केंद्रीय इन्वेस्टिगेटिंग एजन्सीजनी फौजदारी प्रक्रिया सुरु केली आहे आणि/किंवा ते फसवणुक म्हणून रिपोर्ट केले जावेत असे फसवणुकीबाबतचे रिपोर्टही पाठविले जावेत.

३.१.३ एनबीएफसींनी त्यांच्या दुय्यम कंपन्यांमध्ये (सबसिडीअरीज) तसेच संलग्न/संयुक्त उद्योगात झालेल्या फसवणुकीचे रिपोर्टही पाठवावेत. तथापि अशा फसवणुकींचा समावेश मात्र खाली दिलेल्या परिच्छेद ४ मध्ये दिलेलेल्या तिमाही प्रगती अहवालात आणि न फेडलेल्या (आऊटस्टँडिंग) फसवणुकींच्या रिपोर्ट्समध्ये करु नये.

३.१.४ जेथे फसवणुकीची रक्कम रु. २५ लाख किंवा अधिक असेल अशा प्रकरणांमध्ये फसवणुकीचे अहवाल विहित नमुन्यामध्ये डिपार्टमेंट ऑफ बँकिंग सुपरव्हिजन, फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल, भारतीय रिझर्व बँक ह्यांचेकडे पाठवावेत आणि फसवणुकीची रक्कम रु. २५ लाखपेक्षा कमी असल्यास, त्या एनबीएफसीचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या आधिकार क्षेत्रात असेल त्या, रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यलयातील डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनकडे, ती फसवणुक आढळून आल्यानंतरच्या तीन आठवड्यात, एफएमआर - १ ह्या नमुन्यात असे अहवाल पाठवावेत.

जेथे फसवणुकीची रक्कम रु. २५ लाख व अधिक असेल तेथे त्याबाबतचा अहवाल, त्या एनबीएफसीचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या

अधिकार क्षेत्रात असेल त्या, रिझर्व बँकेच्या, डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठवावा.

**३.२ तत्वहीन कर्जदारांनी केलेल्या फसवणुकी**

३.२.१ असे दिसून अले आहे की, कंपन्या भागीदारी कंपन्या/मालक कंपन्या आणि/किंवा त्यांचे संचालक/भागीदार ह्यांच्याद्वारेच पुढील प्रकारांनी अनेक फसवणुकी केल्या जातात.

(१) संलेखांचे डिसकाऊंटिंग करताना लबाडी करणे.

(२) तारण ठेवलेले स्टॉक (भाग) लबाडीने काढून घेणे / एनबीएफसीच्या माहिती शिवायच तारण ठेवलेल्या स्टॉकची वासलात लावणे/ स्टॉकच्या विवरणपत्रात स्टॉकचे मूल्य फुगवून दाखविणे आणि अधिकतर वित्त मिळविणे.

(३) कर्ज मर्यादेच्या बाहेर निधी वळविणे, कर्जदारांना फिकिर नसणे किंवा फौजदारी गुन्हा समजण्याजोगा निष्काळजीपणा ठेवणे, व्यवस्थापकीय अपयशामुळे एकक आजारी पडणे, आणि एनबीएफसी द्वारा कामजाजात शिथिलता ठेवल्याने त्या खात्याबाबत वसुली करणे कठीण होणे.

*३.२.२ [१]कर्ज खात्यांमधील फसवणुकींबाबत एफएमआर - १ च्या विभागात विहित केलेली माहितीही दिली जावी.*

**३.३ रु. २५ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकी**

रु. २५ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकींमध्ये, वरील परिच्छेद ३.१ व ३.२ मध्ये दिलेल्या आवश्यकतांशिवाय, ती फसवणुक आढळल्याच्या एक आठवड्याच्या आत त्या एनबीएफसीने, डी.ओ. पत्राद्वारे, त्याबाबत प्रभारी महाव्यवस्थापक, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग सुपरव्हिजनच्या प्रभारी महाव्यवस्थापक, केंद्रीय कार्यालय ह्यांचेकडे पाठवावी. त्यापत्रात त्या फसवणुकीबाबत थोडक्यात माहिती द्यावी. जसे, फसवणुकीची रक्कम, फसवणुकीचा प्रकार, फसविण्याची थोडक्यात रीत, शाखा/कार्यलयाचे नाव, गुंतलेल्या पक्षांची नावे (मालकी/भागीदारी कंपन्या किंवा प्रायव्हेट लि. कंपन्या असल्यास, मालक, भागीदार व संचालकांची नावे द्यावीत.), गुंतलेल्या/संबंधित अधिकाऱ्यांची नावे व पोलिसात तक्रार केली आहे काय ह्याची माहिती. ह्या डी.ओ. पत्राची एक प्रत, ती एनबीएफसी ज्याच्या अधिकारक्षेत्रात येते त्या रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयातील, डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनकडेही पाठवावी.

**३.४ फसवणुक करण्याचा प्रयत्न केलेली प्रकरणे**

जर फसवणुक प्रत्यक्ष झाली असता संभाव्य तोटा रु. २५ लाख किंवा अधिक होऊ शकला असता, अशा फसवणुक करण्याच्या प्रयत्नाबाबतची प्रकरणे रिझर्व

---

[१] डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र. १२७ /०३.१०.४२/२००८-०९ दि. ऑगस्ट १४, २००८ अन्वये सुधारित

बँकेचे केंद्रीय कार्यालय, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग सुपरव्हिजन, फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल येथे पाठवून त्याची एक प्रत रिझर्व बँकेचे केंद्रीय कार्यालय, डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजन ह्यांचेकडे पाठवावी. ह्या अहवालात ती फसवणुक करावयाची रीत व ती कशी उघडकीस आली हेही त्यात देण्यात यावे. अशी प्रकरणे, रिझर्व बँकेला पाठवावयाच्या इतर अहवालात समाविष्ट केली जाऊ नयेत.

## ४. तिमाही अहवाल

### ४.१ अदत्त/शिल्लक

४.१.१ रक्कम कितीही असली तरी, संबंधित तिमाहीची अखेर झाल्याच्या १५ दिवसांच्या आत एनबीएफसीचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकारक्षेत्रात येते त्या आरबीआयच्या प्रादेशिक कार्यालयातील डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनकडे, एनबीएफसींनी, एफएमआर - २ मध्ये दिलेल्या नमुन्यात अदत्त/शिल्लक फसवणुकींच्या तिमाही अहवालाची प्रत पाठवावी.

४.१.२ ह्या अहवालाचा भाग - अ हा त्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेल्या फसवणुकींची सविस्तर माहिती देतो. अहवालाचे भाग २ व ३, त्या तिमाहीत कळविलेल्या फसवणुकींची अनुक्रमे प्रकारनिहाय व केलेल्या कार्यरीतींची माहिती देतो. त्या तिमाहीत कळविलेल्या फसवणुकींची भाग २ व ३ मधील रक्कम व संख्या ही त्या अहवालातील भाग अ मधील स्तंभ ४ व ५ च्या बेरजेशी जुळली पाहिजे.

४.१.३ ह्या अहवालाचा एक भाग म्हणून एनबीएफसींनी एक प्रमाणपत्र द्यावे की, त्या तिमाहीत रु. १ लाख व अधिक रकमेची व एफएमआर - १ मध्ये आरबीआयला कळविलेली सर्व वैय्यक्तिक फसवणुकीची प्रकरणे एनबीएफसींनी त्यांच्या बोर्डासमोर सादर केली आहेत आणि ती एफएमआर - २ च्या भाग - अ मध्ये (स्तंभ ४ व ५) आणि एफएमआर - २ च्या भाग ब व क मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

### ४.२ फसवणुकींबाबत प्रगति अहवाल

४.२.१ एनबीएफसींनी, रु. १ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकीबाबतचे प्रकरणनिहाय तिमाही अहवाल एफएमआर - ३ नमुन्यात २५ लाख व अधिक रकमेबाबत रिझर्व बँकेच्या केंद्रीय कार्यालयातील, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग सुपरव्हिजन, फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल ह्यांचेकडे पाठवावेत आणि फसवणुकीची रक्कम रु. २५ लाखांपेक्षा कमी असल्यास ते अहवाल, त्या एनबीएफसीचे पंजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्रात येते त्या रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाच्या डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजनकडे संबंधित तिमाहीच्या अखेरीनंतर १५ दिवसांच्या आत पाठवावेत.

४.२.२ ज्या फसवणुकींच्या बाबतीत त्या तिमाहीत कोणतीही प्रगती झाली नसेल तेथे एफएमआर - ३ अनुसार, अशा प्रकरणांची यादि, थोडक्यात वर्णन व शाखेचे नाव आणि अहवाल पाठविण्याची तारीख कळवावी.

## ५. संचालक मंडळाला कळविणे

## ५.१ फसवणुकींचा अहवाल

५.१.१ एनबीएफसींनी खात्री करुन घ्यावी की रु. १ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकी उघडकीस आल्यावर त्यांच्या मंडळाला ताबडतोब कळविल्या जातील.

५.१.२ इतर गोष्टींबरोबर, ह्या अहवालात संबंधित अधिकाऱ्यांच्या अपयशाची नोंद घेण्यात यावी आणि फसवणुकींना जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा विचार केला जावा.

## ५.२ फसवणुकींबाबत तिमाही आढावा

५.२.१ संबंधित तिमाहीनंतरच्या महिन्यात, मार्च, जून व सप्टेंबर अखेरीस संपणाऱ्या तिमाहींशी संबंधित फसवणुकींबाबतची माहिती संचालक मंडळासमोर ठेवली जावी.

५.२.२ ह्याच्याबरोबर विश्लेषक अशी आकडेशास्त्रीय माहिती व प्रत्येक फसवणुकीची सविस्तर माहिती दिली जावी. त्यामुळे अशा फसवणुकींबाबत दंडात्मक किंवा प्रतिबांधक उपाय मंडळाकडून सुचविले जातील.

५.२.३ रु. २५ व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकींवर ऑडिट कमिटी ऑफ दि बोर्ड (एसीबी) ने देखरेख व पुनरावलोकन करावे. एसीबीच्या गैरहजेरीत एनबीएफसीच्या मंडळाची अन्य समिती हे काम करेल. अशा प्रकरणांच्या संख्येनुसार ह्या समितीच्या सभांची नियतकालिकता ठरविण्यात यावी. तथापि, रु. २५ लाख व अधिक रकमेची फसवणुक उघडकीस आल्यावर ह्या समितीने सभा घेऊन आढावा घ्यावा.

## ५.३ फसवणुकींचे वार्षिक पुनरावलोकन

५.३.१ एनबीएफसींनी फसवणुकींचा वार्षिक आढावा घेऊन संचालक मंडळाच्या माहितीसाठी त्यांच्यासमोर त्याबाबतचे टाचण टोचावे. डिसेंबर अखेर संपलेल्या वर्षाचा आढावा पुढील वर्षातील मार्च अखेर बोर्डासमोर सादर करावा. अशी पुनरावलोकने आरबीआयकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. तथापि ती, रिझर्व बँकेच्या तपासणी अधिकाऱ्याच्या पडताळणीसाठी सांभाळून ठेवावीत.

५.३.२ असे पुनरावलोकन करते वेळी विचारात घेण्याचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.:-

(अ) फसवणुक झाल्यानंतर ती कमीत कमी वेळात ओळखण्या/उघडकीस आणण्यासाठी एनबीएफसीमधील प्रणाली सक्षम आहेत काय.

(ब) कर्मचाऱ्यांच्या दृष्टीकोनमधून फसवणूकी तपासल्या जातात काय.

(क) जबाबदार ठरलेल्या व्यक्तींना आवश्यक तेथे निवारक शिक्षा दिली जाते काय.

(ड) प्रणाली व कार्यरीतींचे अनुपालन करण्यातिल शिथिलतेमुळेच फसवणुक झाली आहे काय व तसे असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांकडून त्या प्रणाली व कार्यरीतींचे काटेकोरपणे केले

जाण्यासाठी परिणामकारक कारवाई करण्यात आली आहे काय.

(ई) प्रकरणानुसार फसवणुकींची माहिती स्थानिक पोलिसांना देण्यात आली आहे काय.

५.३.३ वार्षिक आढाव्यांमध्ये इतर गोष्टींबरोबर पुढील माहितीही असावी. :-

(अ) मागील २ वर्षाच्या तुलनेत त्या वर्षात उघडकीस आलेल्या फसवणुकी व संबंधित रक्कम

(ब) परिच्छेद २.१ मध्ये दिलेल्या निरनिराळ्या वर्गीकरणांनुसार केलेले फसवणूकींचे विश्लेषण तसेच अदत्त/शिल्लक फसवणुकींच्या तिमाही अहवालात (एफएमआर - २ अनुसार) निर्देशिलेली व्यवहार क्षेत्रे

(क) त्या वर्षात कळविल्या गेलेल्या मोठ्या/महत्वाच्या फसवणुकींची कार्यरीत व त्याबाबतची सध्याची स्थिती.

(ड) रु. १ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकींची विश्लेषणे

(ई) फसवणुकींमुळे त्या एनबीएफसीला त्या वर्षात आलेला तोटा, परत मिळवलेली रक्कम व केलेल्या तरतुदी

(फ) कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या प्रकरणांची संख्या व कर्मचाऱ्यांविरुद्ध केलेली कारवाई.

(ग) फसवणुकी ओळखण्यासाठी लागलेला वेळ (फसवणुक घडल्यावर, तीन महिन्यात, सहा महिन्यात आणि एक वर्षात उघड केलेल्या प्रकरणांची संख्या)

(ह) पोलिसांना कळविलेल्या फसवणुकींबाबतची स्थिती.

(आय) एनबीएफसीकडून अंतिम कारवाई केली गेली आहे अशा फसवणुकींची संख्या आणि वासलात लागलेली प्रकरणे

(ज) फसवणुकीचे प्रसंग कमी/किमान करण्यासाठी एनबीएफसीने केलेले निवारक/दंडात्मक उपाय

## ६. पोलिसांना फसवणुकीबाबत कळविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

बेकायदेशीर मतलबासाठी (ग्रॅटिफिकेशन) एनबीएफसीद्वारा अनाधिकृत कर्ज सुविधा दिल्या जाणे, निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट, फसविणे, बनावटगिरी इत्यादींसारख्या फसवणुकी राज्य पोलिस प्राधिकरणाकडे कळविण्यासाठी एनबीएफसींनी पुढील मार्गदर्शक सूत्रांचे अवलंबन करावे. :-

(अ) फसवणुक/अफरातफरीची प्रकरणे हाताळताना, एनबीएफसींनी केवळ संबंधित रक्कम परत मिळविण्याचेच ध्येय न ठेवता जनहिताचा विचार करुन दोषी लोक शिक्षेशिवाय सुटून जाणार नाहीत ह्याची खात्री करुन घ्यावी.

(ब) ह्यासाठी एक सर्वसाधारण नियम म्हणून, पुढील प्रकारची प्रकरणे राज्य पोलिसांकडे अवश्य न्यावीत.

(१) बाहेरील व्यक्तींना स्वतःकडून किंवा एनबीएफसीच्या कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या संगनमताने केलेल्या, रु. १ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकीची प्रकरणे.

(२) एनबीएफसीच्या स्वतःच्या व रु. १०,००० पेक्षा अधिक रकमेच्या निधीबाबत एनबीएफसीच्या कर्मचाऱ्यांनी केलेली फसवणुक.

**एफएमआर - १**

**एनबीएफसीमध्ये प्रत्यक्ष घडलेल्या किंवा संशयित फसवनुकीवरील अहवाल**

(परिच्छेद ३ अनुसार)

**भाग - १ : फसवणुकीचा अहवाल**

| | |
|---|---|
| १. एनबीएफसीचे नाव | |
| २. फसवणुक क्रमांक[१] | |
| ३. शाखेची माहिती[२] | |
| (अ) शाखेचे नाव | |
| (ब) शाखेचा प्रकार | |
| (क) स्थळ | |
| (ड) जिल्हा | |
| (ई) राज्य | |
| ४. मुख्य पक्षाचे/खात्याचे नाव[३] | |
| ५.(अ) फसवणुक आढळून आली ते कार्यक्षेत्र[४] | |
| ५.(ब) कर्ज खात्यामध्ये फसवणुक आढळली आहे काय? | होय/नाही |
| ६.(अ) फसवणुकीचा प्रकार/जात[५] | |
| ६.(ब) फसवणुकीसाठी कॉम्प्युटरचा उपयोग केला गेला होता काय? | |
| ६.(क) होय असल्यास त्याबाबतची माहिती | |
| ७. संबंधित एकूण रक्कम[६] (रु. लाख) | |
| ८.(अ) घडल्याची तारीख[७] | |
| (ब) उघडकीस आल्याची तारीख[८] | |
| (क) उघडकीस आणण्यामधील विलंबाचे (असल्यास) कारण | |
| (ड) आरबीआयला कळविण्याची तारीख[९] | |
| (ई) ही फसवणुक आरबीआयला कळविण्यामधील विलंबाचे (असल्यास) कारण | |
| ९.(अ) फसवणुकीच्या कार्यरीतीची (ब) थोडक्यात माहिती | |
| १०. फसवणुक करणार | |
| अ कर्मचारी | होय/नाही |
| ब ग्राहक | होय/नाही |
| क बाहेरील व्यक्ती | होय/नाही |
| ११.(अ) नियंत्रक कार्यालय (प्रादेशिक / विभागीय) ही फसवणुक नियंत्रक | होय/नाही |

| | |
|---|---|
| अहवालांवरुन (असल्यास) शोधून काढू शकले काय | |
| (ब) माहिती प्रणालीमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे काय? | होय/नाही |
| १२.(अ) ती फसवणुक प्रत्यक्ष घडल्याची व उघडकीस आल्याची तारीख ह्या दरम्यान अंतर्गत तपासणी/ऑडिट (कॉंकरंट ऑडिटसह) त्या शाखांमध्ये केले गेले होते काय? | होय/नाही |
| (ब) होय असल्यास, त्या तपासणी/ऑडिट दरम्यान ती फसवणुक उघडकीस का आली नाही. | |
| (क) अशा तपासणी/ऑडिट दरम्यान ती फसवणुक उघडकीस न आणली जाण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे. | |

१३. केलेली / प्रायोजित कारवाई

| | |
|---|---|
| अ) पोलिसात तक्रार | |
| १) पोलिसांकडे एखादी तक्रार केली आहे काय? | होय/नाही |
| २) होय असल्यास त्या पोलिस स्टेशनचे नाव. | |
| संदर्भाची तारीख | |
| प्रकरणाची सध्याची तारीख | |
| पोलिस तपास पूर्ण झाल्याची तारीख | |
| पोलिसांनी तपासणी अहवाल सादर केल्याची तारीख | |
| ३) पोलिसांकडे कळविले नसल्यास त्याबाबतची कारणे | |

ब) कोर्ट/इतरत्र परतफेडीसाठी केलेली फिर्याद

| | |
|---|---|
| १) फिर्याद दाखल केल्याची तारीख | |
| २) सध्याची तारीख | |

क) विम्याबाबतचा दावा

| | |
|---|---|
| १) विमा कंपनीकडे एखादा दावा दाखल केला आहे काय | होय/नाही |
| २) तसे नसल्यास त्याबाबतची कारणे | |

ड) स्टाफ साईड ॲक्शनची संपूर्ण माहिती

| | |
|---|---|
| १) ह्याबाबत अंतर्गत तपासणी | होय/नाही |

| | |
|---|---|
| करण्यात/करण्याचे ठरविण्यात आले आहे काय | |
| २) होय असल्यास ती पूर्ण झाल्याची तारीख | |

३) एखादी विभागीय चौकशी करण्यात/करण्याचे ठरविण्यात आले आहे काय

४) होय असल्यास खाली दिलेल्या नमुन्यात माहिती द्यावी.

५) तसे नसल्यास त्याबाबतची कारणे

| **क्रमांक** | **नाव** | **हुद्दा** | **निलंबित केले आहे काय / निलंबनाची तारीख** | **चार्टशीट दिल्याची तारीख** | **अंतर्गत (डोमॅस्टिक) चौकशी सुरु केल्याची तारीख** | **चौकशी पूर्ण केल्याची तारीख** | **दिलेली शिक्षा** | **फिर्याद / निवाडा / सुटका इत्यादींची माहिती** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | |
|---|---|
| ई) असे प्रसंग टाळण्यासाठी केलेले/करण्यात येणारे उपाय | |
| १४. (अ) वसूल झालेली एकूण रक्कम | |
| १) संबंधित पक्षांकडून वसूल झालेली रक्कम | |
| २) विमा कंपनीकडून | |
| ३) इतर स्त्रोतांमधून | |
| (ब) एनबीएफसीला झालेला तोटा | |
| (क) त्यासाठी असलेली तरतुद | |
| (ड)काढून टाकलेली (राईट ऑफ) रक्कम | |
| १५. आरबीआयच्या विचारांसाठी सूचना | |

**भाग ब : कर्ज खात्यामधील फसवणुकीबाबत अतिरिक्त माहिती**

(सर्व कर्ज खात्यातील रु. ५ लाख किंवा अधिक रकमेच्या फसवणुकींसाठी हा भाग पूर्ण करावयाचा आहे.)

| अनुक्रमांक | पक्षाचा प्रकार | पक्ष / खात्याचे नाव | पकाशाचा पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**कर्ज खात्यांची माहिती :**

| पक्षाचा अनुक्रमांक | पक्ष / खात्याचे नाव | कर्ज खात्याचा अनुक्रमांक | खात्याचा प्रकार | मंजुरीची तारीख | मंजुरी प्राप्त मर्यादा | शिल्लक येणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**कर्ज खात्याच्या संचालक / मालकाची माहिती :**

| पक्ष / खात्याचे नाव | अनुक्रमांक | संचालक / मालकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**संलग्न संस्था :**

| पक्ष / खात्याचे नाव | संलग्न संस्थेचा अनुक्रमांक | संलग्न संस्थेचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**संलग्न संस्थेच्या संचालक / मालकाची माहिती :**

| संलग्न संस्थेचे नाव | अनुक्रमांक | संचालकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

## फसवणुकीचा अहवाल तयार करण्यासाठी (एफएमआर - १) सूचना

[१] फ्रॉड नंबर (फसवणुक क्रमांक) : संगणकीकृत करण्यासाठी व संदर्भ शोध घेण्यासाठी हा घालण्यात आला आहे. ह्या क्रमांकात अक्षरे व अंक पुढीलप्रमाणे - चार अक्षरे (एनबीएफसीच्या नावासाठी), वर्षासाठी २ अंक (०२, ०३ इत्यादी), तिमाहीसाठी दोन अंक (जानेवारी ते मार्चसाठी ०१) आणि शेवटचे चार अंक हे त्या तिमाहीत कळविलेल्या फसवणुकीसाठी धावते अंक.

[२] शाखेचे नाव : एखादी फसवणुक एकापेक्षा अधिक शाखांशी संबंधित असल्यास, जेथे संबंधित रक्कम सर्वात जास्त असेल त्या एकाच शाखेचे आणि/किंवा ह्या फसवणुकीचा पाठपुरावा करण्यासाठी मुख्यतः संबंधित असलेल्या शाखेचे नाव दिले जावे. इतर शाखांची नावे ही बाब क्र. ९ समोर दिलेल्या थोडक्यात इतिहास/कार्यकृतीची रीत मध्ये दिली जावीत.

[३] पक्षाचे नाव : त्या फसवणुकीची ओळख पटविणारे स्पष्ट नाव दिले जावे. कर्ज खात्यात झालेल्या फसवणुकींबाबत कर्जदारांची नावे दिली जावीत. कर्मचाऱ्यांकडून केल्या गेलेल्या फसवणुकींसाठी त्या फसवणुकींची ओळख देण्यासाठी कर्मचाऱ्यांची नाव/नावे दिली जावीत. आंतर-शाखीय फसवणुक झाली असून त्यात एखाद्या विशिष्ट कर्मचाऱ्याचे नाव ओळखणे शक्य नसल्यास त्या फसवणुकीला "आंतर-शाखीय फसवणुक" असे नाव दिले जावे.

[४] फसवणुक / आढळून आलेले कार्यक्षेत्र : एफएमआर २ (भाग १) (कॅश; डिपॉझिट्स (टर्म)), नॉन-रेसिडेंट अकाऊंट्स, ॲडव्हान्सेस (कॅश क्रेडिट/टर्म लोन्स/बिल्स/इतर), विदेशी मुद्रा व्यवहार, आंतर-बँकीय खाती, चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी. खाती, ताळेबंदाबाहेरील (पतपत्रे/हमी/सह-स्वीकार/इतर); इतर) मधील स्तंभ १ मध्ये दिलेल्या संबंधित क्षेत्राचे नाव लिहावे.

[५] फसवणुकीचा प्रकार : पुढील प्रकारातून, फसवणुकीच्या प्रकाराचे सर्वात चांगले वर्णन करणारा अंक/क्रमांक निवडा - (१) अफरातफर व विश्वासभंगाचा गुन्हा, (२) बनावट संलेखाद्वारे/खोट्या खात्यांमार्फत बुक्स ऑफ अकाऊंट्स मध्ये लबाडी करुन व मालमत्तेचे रुपांतरण करुन पैसे लुबाडणे, (३) बेकायदेशीर लाभ/बक्षिसासाठी अनाधिकृत कर्ज सुविधा देऊ करणे, (४) निष्काळजीपणा व रोकड रकमेत तूट, (५) फसवणे व बनावट पत्रे तयार करणे, (६) विदेशी मुद्रेमधील व्यवहारात अनियमितता, (७) इतर.

[६] संबंधित एकूण रक्कम : सर्व ठिकाणी रकमा ह्या दोन दशांश स्थळांपर्यंत रु. लाख मध्ये लिहिल्या जाव्यात.

[७] फसवणुक घडल्याची तारीख : फसवणुकीची नेमकी तारीख देणे कठीण असल्यास (उदा. बऱ्याच मोठ्या काळात फसवणुक होत राहिली असल्यास किंवा कर्जदाराकडून केली व नंतर फसवणुक ठरलेल्या कृतीची तारीख ही खात्री करुन घेण्याजोगी नसल्यास) अशी एखादी अंदाजे तारीख लिहावी की ज्या तारखेस त्या व्यक्तीने ती फसवणुक केली असल्याची शक्यता आहे. (जसे, वर्ष २००२ मध्ये केव्हाही केल्या गेलेल्या फसवणुकीसाठीची तारीख जानेवारी १, २००२) विशिष्ट माहिती (म्हणजे ती फसवणुक कोणत्या कालावधीत केल्याचे आढळून आले) पूर्वेतिहास/कार्यकृतीची रीत मध्ये देण्यात यावी.

[८] आढळल्याची तारीख : नेमकी तारीख मिळत नसल्यास (तपासणी/ऑडिट दरम्यान उघडकीस आलेली फसवणुक किंवा रिझर्व बँकेच्या निदेशावरुन) अमुक एका दिवशी ती फसवणुक उघडकीस आल्याचे समजून ती तारीख लिहावी.

[९] आरबीआयला कळविल्याची तारीख : ह्या बाबतीत एकसमान तारीख म्हणजे आरबीआयला फॉर्म एफएमआर - १ मध्ये सविस्तर रिपोर्ट पाठविल्याची तारीख असेल त्याआधी फॅक्स किंवा डीओ पाठविल्याची तारीख नव्हे.

**एफएमआर - २**

## शिल्लक असलेल्या फसवणुकींवरील तिमाही अहवाल

(परिच्छेद ४.१ अनुसार)

**एनबीएफसीचे नाव** ________________________________

________________________ **रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अहवाल** **देशांतर्गत/विदेशातील**

**भाग - १ शिल्लक फसवणुकी**

(रक्कम रु. लाख मध्ये)

| प्रकार | गेल्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक फसवणुकींची प्रकरणे | | चालु तिमाहीमध्ये कळविलेली नवीन प्रकरणे | | चालु तिमाहीत संपवलेली प्रकरणे | | ह्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसुल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतूद | चालु तिमाहीत वसूल झालेली रक्कम | चालु तिमाहीत काढून टाकलेली (राईट ऑफ) रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. (२+४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| रोख | | | | | | | | | | | | |
| ठेवी<br>(१) आवर्ती<br>(२) दैनंदिन<br>(३) मुदत<br>(४) इतर | | | | | | | | | | | | |

| प्रकार | गेल्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक फसवणुकींची प्रकरणे | | चालु तिमाहीमध्ये कळविलेली नवीन प्रकरणे | | चालु तिमाहीत संपवलेली प्रकरणे | | ह्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसुल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतूद | चालु तिमाहीत वसूल झालेली रक्कम | चालु तिमाहीत काढून टाकलेली (राईट ऑफ) रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. (२+४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| अनिवासी खाती | | | | | | | | | | | | |
| अग्रिम राशी<br>(१) कॅश क्रेडिट<br>(२) मुदत कर्जे<br>(३) बिले<br>(४) इतर | | | | | | | | | | | | |
| आंतर-शाखीय खाती | | | | | | | | | | | | |
| ताळेबंदाबाहेरील<br>(१) पतपत्रे<br>(२) हमी<br>(३) सहस्वीकार<br>(४) इतर | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इतर | | | | | | | | | | | | |

| प्रकार | गेल्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक फसवणुकींची प्रकरणे | | चालु तिमाहीमध्ये कळविलेली नवीन प्रकरणे | | चालु तिमाहीत संपवलेली प्रकरणे | | ह्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसुल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतूद | चालु तिमाहीत वसूल झालेली रक्कम | चालु तिमाहीत काढून टाकलेली (राईट ऑफ) रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. (२+४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| एकूण | | | | | | | | | | | | |

**सूचना :** परदेशात शाखा/कार्यालये असलेल्या भारतीय एनबीएफसीसाठी वरील आकडे देशांतर्गत स्थितीसाठी आहेत. विदेशातील शाखा/कार्यालये ह्याबाबतचे आकडे वरील नमुन्यातच परंतु वेगळ्या कागदावर द्यावेत.

**भाग ब : तिमाहीमध्ये कळविलेल्या फसवणुकींचे त्यांच्या प्रकारांनुसार वर्गीकरण** ____________

**एनबीएफसीचे नाव** ____________________________________

| प्रकार | अफरातफर विश्वासभंगाचा गुन्हा | | लबाडीने वटविणे/ लेखा हेराफेरी व मालमत्तेचे रुपांतर | | बेकायदेशीर लाभ बक्षिसासाठी अनाधिकृत कर्ज सुविधा | | निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट | | फसविणे व बनावट कागदपत्रे देणे | | विदेशी मुद्रा खात्यात अनियमितता | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम |
| रु. १ लाख पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु. १ लाखापेक्षा जास्त परंतु २५ लाखा पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु, २५ लाख पेक्षा जास्त | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

**भाग - क : तिमाहीत कळाविलेल्या फसवणुकींचे फसविणारांच्या धर्तीवरील वर्गीकरण** ________

**एनबीएफसीचे नाव** ____________________________________

| वर्गवारी | कर्मचारी | | ग्राहक | | बाहेरील लोक | | कर्मचारी व ग्राहक | | कर्मचारी व बाहेरील लोक | | ग्राहक व बाहेरील लोक | | कर्मचारी, ग्राहक व बाहेरील लोक | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम | क्र. | रक्कम |
| रु. १ लाख पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु. १ लाखापेक्षा जास्त परंतु २५ लाखा पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु, २५ लाख पेक्षा जास्त | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

**सूचना :** १. वरील प्रकार निहाय असलेले वर्गीकरण भारतीय दंड संहितेच्या निरनिराळ्या तरतुदींनुसार करण्यात आले आहे.

२. सर्व रकमा रु. लाखमध्ये दोन दशांश स्थळांपर्यंत द्याव्यात.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येत आहे की, गेल्या तिमाहीत रिझर्व बँकेला कळविण्यात आलेल्या रु. १ लाख व अधिक रकमेच्या फसवणुकी एनबीएफसीच्या मंडळालाही कळविण्यात आल्या असून त्या वरील भाग १ मध्ये (स्तंभ ४ व ५) आणि भाग ब व क मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

सही :
नाव व पदनाम :

स्थळ :
दिनांक :

**एफएमआर - ३**

## रु. १.०० लाख व अधिक रकमेच्या फसवणुकींवरील तिमाही प्रगती अहवाल

(परिच्छेद ४.२ अनुसार)

**एनबीएफसीचे नाव : ______________________________**

**______________________ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी विवरणपत्र**

**भाग - अ : सारांशाने माहिती**

| | | क्रमांक | संबंधित रक्कम (रु. लाख मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | शिल्लक असलेली प्रकरणे | | |
| २ | कोणतीही प्रगती नसलेली प्रकरणे (खालील भाग ब च्या नमुन्यामध्ये प्रकरणनिहाय माहिती द्यावी.) | | |
| ३ | प्रगती होत असलेली प्रकरणे (खालील भाग क च्या नमुन्यामध्ये प्रकरणनिहाय माहिती द्यावी.) | | |

**भाग ब : प्रगती नसलेल्या प्रकरणांची माहिती**

| क्र. | शाखेचे नाव | फसवणुक क्र. | पक्ष/खात्याचे नाव | रक्कम (रु. लाख मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**भाग क : प्रकरणनिहाय प्रगतीची माहिती**

**पक्षाचे/खात्याचे नाव :** ____________________________________

**शाखा/कार्यालयाचे नाव :** ____________________________________

**संबंधित रक्कम**

**(रु. लाख मध्ये)** ______________________________

**फसवणुक क्रमांक :** ______________________________

| | |
|---|---|
| १. सर्व प्रथम कळाविल्याची तारीख | |
| २. (अ) डीआरटी/इतर ह्यांचेकडे वसुली दावा दाखल केल्याची तारीख | |
| (ब) सध्याची स्थिती | |
| ३. मागील तिमाहीच्या अखेरीस केलेली वसुली (रु. लाख मध्ये) | |
| ४. ह्या तिमाहीमध्ये केलेली वसुली (रु. लाख मध्ये) | |
| (अ) संबंधित पक्षांकडून | |
| (ब) विमा कंपनीकडून | |
| (क) इतर स्त्रोतांकडून | |
| ५. एकूण वसुली (३+४) (रु. लाख मध्ये) | |
| ६. एनबीएफसीला झालेला तोटा (रु. लाख मध्ये) | |
| ७. ठेवलेली तरतुद (रु. लाख मध्ये) | |
| ८. काढून टाकलेली (राईट ऑफ रक्कम (रु. लाख मध्ये) | |
| ९. (अ) पोलिसांना कळविल्याची तारीख<br>(ब) पोलिस तपास पूर्ण झाल्याची तारीख<br>(क) पोलिसांनी तपास अहवाल सादर केल्याची तारीख | |

१०. स्टाफ-साईड ॲक्शनची माहिती

| क्र. | नाव | पदनाम | निलंबित केले काय /निलंबनाची तारीख | आरोपपत्र दिल्याची तारीख | अअतर्गत चौकशी सुरु केल्याची तारीख | चौकशी पूर्ण झाल्याची तारीख | अंतिम आदेश दिल्याची तारीख | दिलेली शिक्षा | खटला भरण्याची/ दोषी ठरविण्याची/ सुटण्याची इ. तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| **११. इतर सुधारणा** | |
| १२. तिमाहीतील खटला जेव्हा संपेल | होय/नाही |
| १३. खटला संपल्याची तारीख : | |